# साखरयुद्ध

एके काळी माद्दप्रदेश या देशात एक माणसांची टोळी रहात होती. माद्दप्रदेशीयांना गोड पदार्थ खाण्याची अत्यंत आवड होती. त्या देशाचे सर्व नागरिक, अगदी लहान बाळापासून ते पन्नाशीपर्यंतच्या माणसांना धरून लठ्ठ होते. पन्नाशीवरची, माणसं माद्दप्रदेशात नव्हतीच. कारण सगळी माणसं पन्नाशीच्या आधीच स्वर्गात पोचत असत.

माद्दप्रदेशीयांचा प्रमुख, गजराज सतत जनतेच्या लठ्ठपणाबद्दल व गोडखाऊपणाबद्दल काळजी करत असे. अर्थात तो स्वतः जाडच होता व त्याच्या तीन बायका व पंचवीस मुलं रात्रंदिवस आईस्क्रीम, केक, लाडू, पेढे, मिठाई व तत्सम पदार्थांवर ताव मारत असत.

एक दिवस चिंचिला ह्या देशाच्या दूरदर्शनवर गजराजाने एक बातमी ऐकली. माद्दप्रदेशाचे काही नागरिक चिंचिलेत एका विजेच्या पाळण्यात गर्दी करून घुसले. तो पाळणा पाचव्या मजल्यावर असताना त्याचा तळ माद्दप्रदेशीयांसह कोसळला. पाळण्याखालच्या खड्ड्यातून एकमेकांवर कोसळलेल्या माद्दप्रदेशीयांना उठून उभंही राहता येईना. शेवटी चिंचिलेल्या अग्नीखात्याला मोठ्ठी क्रेन आणून माद्दप्रदेशीयांना खड्यातून बाहेर काढावं लागेल.

चिंचिलेत, मग सर्व जगात हे “रेस्क्यू ऑपरेशन” अथपासून इतिपर्यंत दूरदर्शनवर दाखवलं गेलं.

हे ऑपरेशन बघताना पोट धरून हसणारे इतर देशांचे सडपातळ नागरिक सुद्धा गजराजाने दूरदर्शनवर पाहिले. त्यादिवशीच गजराजाने आपल्या जनतेच्या लठ्ठपणावर व गोडखाऊपणावर ताबडतोब जालीम उपाय करण्याचा निश्चय केला.

दुसऱ्या दिवशीच गजराजाने आपल्या खातेप्रमुखांचं चर्चासत्र भरवलं. चर्चासत्राच्या उद्घाटनात गजराज म्हणाला, “खातेप्रमुखहो, आपल्या जनतेच्या गोड खाऊन लठ्ठ होण्याबद्दल तुमचं काय मत आहे?”

सर्व खातेप्रमुखांनी एकमेकांकडे पाहिलं. शेवटी सैनिक खातेप्रमुख काठीवर वजन टाकून उभा रहात म्हणाला, ”आपले सैनिक फक्त मैलभर शस्त्रांसह चालल्यावर धापा टाकीत कोसळतात.”

वैद्यकीयखातेप्रमुख म्हणाला, ”आपल्या देशाची अर्धी आवक इन्सुलिन घेण्यात खर्च होते. आपल्या जनतेत रक्तदाब, हृदयविकार, अर्धांगवायू असे विकार बोकाळले आहेत. आपल्या जनतेच्या रक्तातलं कोलेस्टेरॉलच प्रमाण मोजताना मशिनांचे स्फोट होऊन तुकडे तुकडे होतात.”

परदेशखातेप्रमुख म्हणाला, “माद्यप्रदेशाला सर्व जगच जाड्यप्रदेश म्हणतं.”

प्रवासखातेप्रमुख म्हणाला, “आपल्या देशात येणाऱ्या परदेशी प्रवाश्यांना ‘सापळ्यांसाठी’, ‘पाप्यांच्या पितरांचे कपडे’ अशा नावांच्या दुकानांत कपडे घ्यावे लागतात. उलट आपली जनता परदेशात गेली की ‘गोरिल्यांचे कपडे’, ‘राक्षसांसाठी’, ‘गोलमटोल’ अशा नावांच्या दुकानांत कपडे घेते.”

उड्डाणखातेप्रमुख म्हणाला, “आपण परदेशातून विमानं विकत घेतली की त्या विमानातल्या खुर्च्या काढून आपल्याला दुप्पट रुंदीच्या खुर्च्या व दीडपट लांबीचे खुर्चीपट्टे बसवावे लागतात.”

गजराज हताश झाला. “चॉकलेट आण”. त्याने दासाला आज्ञा केली. ”विचार करण्यासाठी सर्वांच्याच मेंदूला साखरेची जरुरी आहे.”

शेवटी उपप्रमुख ढोलराज उभा राहिला. “आपल्या जनतेच्या साखरखाऊपणावर एकच उपाय सुचतोय. साखरेची किंमत वाढवायची. साखर महाग झाली तर जनतेला गोड खाणं परवडणार नाही.”

सर्व खातेप्रमुखांनी टाळ्या वाजवल्या व साखरेची किंमत दुप्पट करण्याचा ठराव एकमताने पास केला.

रात्रीच्या भोजनाच्या वेळी गजराजाच्या मोठ्या व पट्टराणीने, गजगामिनिने, गजराजाला विचारलं, “आज खातेप्रमुखांचं चर्चासत्र कशाबद्दल भरवलं होतं?”

गजराज म्हणाला, “सखरेबद्दल.”

तिन्ही राण्या एकदम बोलू लागल्या.

“साखरेचा राजकारणाशी काय संबंध?”

“पुरुषांना सखरेबद्दल चर्चासत्र भरवायचा हक्कच नाही.”

“पुरुषांना साखरेचं काय ज्ञान?”

गजराज म्हणाला, “गप्प बसा. माद्दप्रदेशीय गोड खाऊन लठ्ठ झालेत. लठ्ठपणावर उपाय शोधायला मी चर्चासत्र भरवलं. उद्यापासून साखरेची किंमत दुप्पट व गोड खाणं बंद.”

भोजनगृहात शांतता पसरली. टेबलावरच्या गोड पदार्थांकडे पाहत सर्वांनी जिभल्या चाटल्या. मुलं समोरचं जेवण बाजूला ढकलून गोडाकडेच वळली.

शेवटी सगळ्यात लहान राणी म्हणाली, “मी हडकुळी आहे. मी हव्वं तेवढं गोडगोड खाईन.”

मधली राणी म्हणाली, “मी जाडी असले तर काय झालं?” माद्दप्रदेशाच्या राज्यघटनेनुसार राण्यांना वाटेल ते खाण्याचे अधिकार आहेत.”

मग सगळेच आरडाओरडा करू लागले. गजराजाच्या कुटुंबियांत कधी नव्हे ती एकी झाली. शेवटी गजगामिनी म्हणाली, “शांत व्हा, शांत व्हा.”

सगळे गप्प होताच ती गजराजाकडे वळली. “गजराज, मुलाचा जन्म होताच आपण त्याच्या तोंडात त्याचं आयुष्य गोड व्हावं म्हणून साखरेचे दोन कण घालतो. लग्नात, राजकीय, धार्मिक व सामाजिक समारंभात, वाढदिवसाला, अगदी स्मशानयात्रेनंतरही आपण गोड पदार्थ करतो. आपल्या आजाऱ्यांना शिरेतून साखरेचं पाणी पाजतो. आपल्या प्रत्येक देवाचाही आवडता गोड पदार्थ आहे. आपल्या विमाकंपन्यांनी वजन कमी केल्यास विमाहप्ते कमी करण्याचं अयशस्वी आमिष जनतेला अनेकदा दाखवलंय. अगदी मरताना सुद्‌धा माणसाचा स्वर्गाचा प्रवास सुखी व्हावा या हेतूने आपण माणसाच्या तोंडात साखर घालतो. तुम्हाला माद्दप्रदेशीयांचा गोडखाऊपणा कमी करण्यास यश येणार आहे का?”

गजराज म्हणाला, “ह्या विषयाने आता माझं डोकं दुखू लागलंय.”

गजगामिनी म्हणाली, “पण गजराज....”

गजराज गरजला, “तोंड बंद कर.”

गजगामिनी पुटपुटली, “हे पहा, माद्दप्रदेशीयांच्या गोडखाऊपणात ढवळाढवळ करायला परमेश्वरही धजणार नाही. तिथे तुम्ही...”

गजराजाने दाणकन् भांडं आदळलं. गजगामिनी गप्प बसली.

दुसऱ्या दिवशी गजराजाने साखरेची किंमत दुप्पट केली. परिणामी जनता चवताळली.

आकाशवाणीवरचे वटवट यजमान (टॉक शो होस्टस्) तासनतास दूरध्वनीवरून जनतेशी संपर्क साधून ह्या भाववाढीच्या अन्यायाचा धिक्कार करू लागले. लोकांनीही एकमुखाने प्रतिसाद दिला. आकाशवाणी यजमानांनी गजराज व इतर खातेप्रमुखांकडे दूरध्वनीवरून भाववाढीबद्दल तक्रार करण्याचा जनतेला आदेश दिला. परिणामी ज्याला बोलत येत होतं त्याने गजराजाच्या जांभळ्या झोपडीला व खातेप्रमुखांच्या पिवळ्या झोपडीला दूरध्वनी लावला. गजराजाचे फोन रात्रंदिवस ठाणठाणत राहिले.

एका रात्रीत, 'शर्करा भाववाढ प्रतिबंधक समाज', 'गोडखाऊंची संघटना' अशा संघटना स्थापन झाल्या. त्यांनी हरताळ पाडला, पत्रके वाटली, मोर्चे काढले व भिंतीभिंतीवर घोषणा लिहिल्या.

शेवटी "स्वस्त साखर घेण्याचा हक्क राज्यघटनेने माद्दप्रदेशीयांना दिलेला आहे" असं म्हणणारा अतिरेकवादी समूह जन्माला आला. त्यांनी साखरदुकानांना आगी लावल्या. शिपायांवर व साखरेच्या दुकानदारांवर गोळीबार केला.

गजराज भीतीने अर्धमेला झाला. गाजगामिनीने त्याला किटकिट करून भंडावलं . परिस्थितीला वैतागून गजराजाने खूप मिठाई खाल्ली. तो आणखीच जाड झाला. पण त्याने माघार घेऊन साखरेची किंमत कमी केली नाही.

साखरेची भाववाढ झाली त्यादिवशी दुपारी मुंगळ्या व मध्या ओकच्या झाडाखाली सुस्तीत पडले होते. जवळून जाणाऱ्या हमरस्त्यावरच्या आरडाओरडीने मध्याला जाग आली. त्याने मुंगळ्याला हलवून विचारलं, "काय चाललंय हमरस्त्यावर?"

क्षणभरच घोरणं बंद करून मुंगळ्या म्हणाला, "नववर्षाची परेड!"

थोडा वेळ विचार केल्यावर मध्याला आठवलं, "दिवस उन्हाळ्याचे आहेत."

मुंगळ्याला हलवत तो म्हणाला, "मूर्खा, उन्हाळा आहे."

मुंगळ्याने झोपेतच उत्तर दिलं, "माजी सैनिकांची परेड."

मध्या म्हणाला, “उठ. कसली का असेना परेड. आपल्याला काही खायला मिळतं का पाहू या.”

मुंगळ्याला खेचत मध्या हमरस्त्यावर आला. दोघेही आ वासून इकडेतिकडे बघू लागले. हजारो माणसं जांभळ्या झोपडीच्या दिशेने घोषणा देत चालली होती. काहींच्या हातात पाट्या होत्या.

‘साखरेची भाववाढ हे जनतेचं मरण.’

‘स्वस्त साखर हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे.’

‘माद्दप्रदेश ही शर्कराभूमी तर आम्ही शर्कराफुलं.’

‘साखर ही आमची मातृदेवता.’

मधूनमधून जमाव क्षुब्ध होऊन गजराजाचे पुतळे जाळत होता.

मध्या म्हणाला, “ही माणसं कशाला चवताळली आहेत?”

मुंगळ्या म्हणाला, “गजराजाने साखरेची किंमत वाढवलेली दिसतेय. त्याला वेड लागलेलं असावं बहुतेक!”

मध्या म्हणाला, “गजराजाला पैसे हवे असणार म्हणून त्याने साखरेचा भाव वाढवला.”

मुंगळ्या म्हणाला, “मूर्खा, ह्या भाववाढीने गजराजाचा फायदा होणार नाही. साखर विक्रेत्यांचा फायदा होईल. माझ्या बापाला धो धो पैसा मिळेल.”

मध्या म्हणाला, “माझ्या वडिलांनी मला आयव्ही बिझनेस स्कूलमध्ये घातलं. त्यांचा हेतू मी त्यांना धंद्यात मदत करावी असा होता. मी त्यांना मदत करत नाही म्हणून त्यांनी मला घराबाहेर काढलंय. ते मला पैसे देणार नाहीत.”

मध्याने विचारलं, “मग तू त्यांना कां मदत करत नाहीस?”

मुंगळ्या म्हणाला, “मला धान्य आणि साखर विकायचा शुल्लक धंदा करायचा नाही. मला या जगात असामान्य, अलौकिक, भव्य, दिव्य धंदा करायचा आहे.”

मध्याने विचारलं, “असा कुठला धंदा आहे?”

मुंगळ्या म्हणाला, “आत्ता हे चर्वितचर्वण नको. शिपाई यायच्या आत आपल्याला थोडे पैसे गोळा करायला हवेत. टोपी पुढे धरून दीनवाणा उभा राहा. नाही तर संध्याकाळी उपास घडेल.”

थोडी नाणी गोळा करून परतताना मुंगळ्या म्हणाला, “मला अगदी तीन चार तास काम करून पोट भरण्याचा मार्ग सापडलाय.”

त्या रात्री मध्या व मुंगळ्याने एक लहानशी होडी चोरली व एका माणसाचं पाकीट मारून शंभर डॉलर्सचं भांडवल उभं केलं. त्या होडीने मुंगळ्या व मध्या चिंचिलेला गेले. तिथून त्यांनी शंभर डॉलर्सची साखर आणली व रस्त्याच्या कडेला उभं राहून माद्दप्रदेशातल्या साखरेच्या भावापेक्षा थोड्या कमी भावाने विकली.

मध्या व मुंगळ्याच्या साखारव्यापाराची बातमी विजेसारखी लोकात पसरली. त्यांचा धंदा वाढू लागला. त्यांनी मोठ्ठा पडाव विकत घेतला. कामाला नोकर ठेवले. मग आणखी पडाव घेतले.

चिंचिला व इतर देशातून स्वस्त साखर आणून माद्दप्रदेशात विकायची कल्पनाही विजेसारखी माद्दप्रदेशात पसरली. मध्या-मुंगळ्यासारखा साखरेचा धंदा इतर काही लोकांनीही सुरु केला.

माद्दप्रदेशातले साखर विक्रेते त्यांची साखर विकली जाईना म्हणून धंदा बंद करू लागले. काही साखर विक्रेत्यांना दिवाळं काढावं लागलं.

माद्दप्रदेशातली साखरेची विक्री कमी होताच उसाची विक्रीही कमी झाली. एका वर्षी ऊस नासून गेला. शेतकऱ्यांनी ऊस पेरणंच बंद केलं.

परकीय चलन पाण्यासारखं परदेशी वाहू लागलं.

मुंगळ्याला इतर लोकांनी आपली कल्पना अमलात आणून साखर आयातीचा धंदा सुरु करावा हे पसंत पडलं नही. त्याने गुंड कामाला ठेवून इतर साखर आयात करणाऱ्यांचे पडाव बुडवण्याचे प्रयत्न सुरु केले. समुद्रावर साखर आयात करणाऱ्यांच्या चकमकी घडू लागल्या.

मुंगळ्याचे वडील मात्र खूष झाले. “माझा मुलगा आयव्हीच्या पदवीचा अखेरीस उपयोग करतोय” ते म्हणाले.

माद्दप्रदेशीय गोड पदार्थ पूर्वीसारखेच खात होते आणि लठ्ठही होत होते.

राज्यातल्या ह्या सर्व घटनांवर गजराजाचं बारीक लक्ष होतं. तो माद्दपरदेशीयांना रस्त्यावर, शाळांमध्ये, कचेऱ्यात बघतच होता. विमावाल्यांची दर महिन्याला प्रसिद्ध होणारी नागरिकांच्या वजनाची यादी वाचत होता आणि काळजी करत मिठाई खाऊन जाड होत होता. गजगामिनी त्याचं डोकं खातच होती. सुरुवातीला ती फक्त साखरेच्या भाववाढीबद्दल तक्रार करत असे पण आता तिला किटकिट करायला साखरेची आयात, समुद्रावरच्या चकमकी, साखरेच्या भाववाढीबद्दल चालू असलेली निदर्शनं असे अनेक विषय मिळाले होते.

शेवटी गजराजाने परत खातेप्रमुखांचं चर्चासत्र भरवलं. चर्चासत्रात गजराज म्हणाला, “आपण जाडेपणाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत होतो. तो सुटलेलाच नाही. उलट साखरेच्या किंमत वाढीमुळे आपल्या देशात अनेक नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यावर उपाय काय?”

शिक्षणखातेप्रमुख म्हणाला, “साखरेची किंमत वाढ नकोच. जनतेला शिक्षण द्या. अती गोड खाण्याचे दुष्परिणाम शिकवा. रस्त्यावर पाट्या लावा. व्यायामाचं महत्त्व सांगा. ठिकठिकाणी व्यायममंडळ सुरु करून वजन कमी करण्याची मोहीम काढा.”

सर्वांनीच आपल्या सुटलेल्या पोटावर हात फिरवून एकमेकांकडे पाहिलं.

शेतीखातेप्रमुख म्हणाला, “चिंचिलेचं ऊसाचं पीकच नष्ट करा. त्यांच्या ऊसाच्या शेतीवर अग्निबाणांचा वर्षाव करा.”

परदेशखातेप्रमुखाने विचारलं, “अशा किती देशांच्या ऊसाच्या शेतांवर आपण अग्निबाण टाकणार?”

शेवटी ढोलराज उभा राहिला. “मला एक मार्ग दिसतोय. आपण साखरेवरती आयात कर लावूया.”

“चांगली कल्पना आहे.”

“उत्तम!”

“छान!”

अशा धर्तीचे उद्गार निघाले. मग टाळ्या वाजल्या.

गजराजाने विचारलं, “पण हा कर वसूल कोण आणि कसा करणार?”

ढोलराज म्हणाला, “आपल्याला चौक्या बांधाव्या लागतील. करवसुलीसाठी कामगार नेमावे लागतील.”

गजराजाने विचारलं, “आणि हे सर्व करण्यासाठी पैसे कुठून आणणार?”

ढोलराज म्हणाला, “कराचा जो वसूल होईल तो पैसे आपण चौक्या बांधायला, कामगारांना पगार द्यायला वापरू.”

गजराजाने सुस्कारा सोडला. “मला ही आयातकराची कल्पना पूर्णपणे पसंत नाही. पण नाईलाज आहे. जनतेच्या हितासाठी आपण हा साखर आयात कर लावायलाच हवा.”

साखरकराची बातमी प्रसिद्ध होताच आणखी मोर्चे निघाले. अतिरेकवाद्यांनी साखर दुकानावर अग्नीगोळे टाकायचं ठरवलं पण त्यांना साखरेचं दुकान सापडलंच नाही म्हणून त्यांनी शिपायांवर दगडफेक केली. आकाशवाणीच्या वटवट यजमानांना चर्वितचर्वण करायला आणखी एक विषय मिळाला. गजराजाच्या जांभळ्या झोपडीचा दूरध्वनी दिवसरात्र खणखणत राहिला.

गजगामिनीचं गजराजाशी प्रचंड भांडण झालं. “राज्य गमवायचं नसेल तर साखरेवरचा कर व भाववाढ रद्द कर” असं ती म्हणाली. तो म्हणाला, “बायकोच्या नादी लागून मला चालणार नाही. माझ्या जनतेचं हित पाहणं हे माझं आद्य कर्तव्य आहे.”

गजगामिनी म्हणाली, “जनतेचं हित जनता पाहील. तुम्ही त्यांच्या खाण्यापिण्यात ढवळाढवळ करू नका.”

पण जगराज अविचल राहिला.

मुंगळ्या व मध्याच्या तेजीत असलेल्या धंद्यावर अकस्मात साखर आयातकर बसला.

मुंगळ्याने त्यांच्या लाल झोपडीत त्याच्या मदतनिसांची सभा भरवली. त्याचे विश्वासू मदतनीस व मुंगळ्या सोमरस पीत व नृत्य पहात ‘साखर आयात कराबद्दल काय करावं?” ह्याचा विचार करू लागले.

गजराजाच्या जांभळ्या झोपडीपेक्षा हजारोपटीने सरस असलेल्या आपल्या लाल झोपडीकडे पहात डोळ्यात पाणी आणून मध्या म्हणाला, “आपले इथले दिवस संपले. ओकच्या सावलीत परत जाऊ.”

“नाही!” मुंगळ्या म्हणाला. “आपले पडाव आपण रात्री करचौक्या आणि नाकी बंद असताना किनाऱ्याला लावू व दिवस उजाडण्याच्या आत साखरेची पोती शहरात आणू.”

मुंगळ्या रात्री साखर आणतो हे कळताच गजराजाने चौक्या रात्री उघड्या ठेवायला सुरुवात केली. मध्याने मग साखरेची पोती दूरच्या जंगलातल्या किनाऱ्यावर उतरवायला सुरुवात केली. मध्याने साखर गावात न्यायला मोठ्या गाड्या व गावात घरोघरी साखर पोचवायला हातगाड्या विकत घेतल्या. गजराजाने जंगलात रात्रंदिवस पहारेकरी ठेवले. हे पहारेकरीच अनेकदा साखर चोरताना व पैसे खाऊन साखरेच्या गाड्या गावात सोडताना पकडले गेले. साखरेची चोरून आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या नोकराची आपसात व गजराजांच्या पहारेकऱ्याशी मारामारी झाली. ह्या मारामारीत काही निष्पाप नागरिक, पहारेकरी व साखर चोरून आयात करणारे मारले गेले. काही तुरुंगात गेले.

हळूहळू चोरून साखर आयात केल्यामुळे तुरुंगात पडलेल्या कैद्यांची संख्या एवढी वाढली की नवीन तुरुंग बांधावे लागले, नवीन न्यायाधीश नेमावे लागले.

मध्या, मुंगळ्या व इतर चोरून साखर आयात करणाऱ्यांना त्याचा काळा पैसा माद्दप्रदेशाच्या बँकामध्ये ठेवता येईना. म्हणून त्यांनी तो परदेशी बँकात जमा करायला सुरुवात केली. अशा अनेक परदेशी बँकांनी काळा पैसा पांढरा करण्यात स्वतःची तुंबडी भरून घेतली.

गजगामिनीचं गजराजाशी शेवटचं प्रचंड भांडण झालं. ती रागाने जांभळ्या झोपडीतून आपलं सामान घेऊन तरातरा माहेरी निघून गेली.

जनता वैतागली. जनतेला साखर आयात करणाऱ्यांचा, त्यांच्या गुंडांचा, गजराजाच्या पहारेकाऱ्यांचा व शिपायांचा सर्वांचाच तिरस्कार वाटू लागला. जनतेने ह्या सर्वांनाच साखरशिपाई असं नाव ठेवलं. साखरेवरून होणाऱ्या मारामाऱ्यांना जनता साखरयुद्ध म्हणू लागली.

माद्दप्रदेशाचं चलन परदेशी गेल्याने व चौक्या, पहारेकरी, शिपाई, तुरुंग, न्यायाधीश, करनाकी, शस्त्रास्त्रे इत्यादीच्या खर्चाने माद्दप्रदेशाची तिजोरी रिकामी झाली.

माद्दप्रदेशीय पूर्वीसारखेच गोड पदार्थ खात राहिले. त्यांच्या रुंदीत काहीच फरक पडला नाही.

गजराज हताश झाला. त्याने परत चर्चासत्र भरवलं. चर्चासत्र कां भरवलं हे खातेप्रमुखांना न सांगताच कळलं.

शिक्षणखातेप्रमुख म्हणाला, “आपला मार्ग चुकला. आपण शिक्षणावर भर द्यायला हवा होता.”

सैनिकखातेप्रमुख म्हणाला, “आणखी पहारेकरी, शिपाई नेमा. त्यांना मशिनगन्स द्या. रात्री समुद्रावर व जंगलात पहारा करण्यासाठी रात्रदृष्टीवाली (night vision) विमानं पाठवा.”

मुख्य न्यायाधीश म्हणाला, “बंदुकी बेकायदा करा. म्हणजे फक्त सरकारी पहारेकऱ्यांना बंदुकी वापरता येतील. चोरटी आयात करणाऱ्यांना भरदिवसा बाजारात फाशी द्या. मग लोकांना दहशत बसेल.”

प्रदेशप्रमुख म्हणाला, “साखर झार नेमा. जे सर्व देश आपल्या देशात निर्यात करायला साखर विकतात त्या देशात ऊसाचं पीक नष्ट करायला विषारी भुकटी ऊसांच्या शेतांवर शिंपडा.”

संशोधनखातेप्रमुख म्हणाला, “गोडाची आवड असणारी जीन शोधा. मग ती जीन निष्क्रिय करण्याचे मार्ग शोधा.”

गजराज खिन्नपणे हसला व म्हणाला, “खातेप्रमुखांची तुंदीलतनू पाहून व गाजगामिनीचा सल्ला ऐकून मी निर्णय घेतला आहे. आपल्याला जनतेची गोड खाण्याची सवय मोडण्यात मुळीच यश आलेलं नाही आणि आपण काहीही केलं तरी यश येणं शक्य नाही, जनतेने गोड खात रहाण्याचा निश्चय केलेला आहे. मग गोडाने मरण आलं तरी बेहेत्तर! जनतेची साखर खाण्याची सवय मोडण्याच्या माझ्या हट्टाने आपली तिजोरी मात्र रिकामी झालीय. आपलं दिवाळं निघालंय.”

त्या रात्री गजराज एम्.बी.सी. दूरदर्शनवरती जनतेला दिसला. तो म्हणाला, “साखरेची किंमतवाढ व साखरेवरचा कर रद्द करण्यात आला आहे. कारनाकी व चौक्या बंद केल्या आहेत. सगळे पहारेकरी, न्यायाधीश, करवसुली करणारे नोकर्यावरून बडतर्फ केले आहेत. साखरेची किंमत जगाच्या बाजारातील किंमतीनुसार ठरली जाईल.”

माद्दप्रदेशीय दूरदर्शनसमोर, मग घरात, मग रस्त्यांवर लोक नाचले. सबंध रात्र ते नाचतच होते.

गजगामिनी नाचत नाचतच जांभळ्या झोपडीत परतली.

मध्या म्हणाला, “आता मात्र खरंच ओकच्या झाडाखाली परत जावं लागणार.”

मुंगळ्या म्हणाला, “थोडे दिवस थांब. या देशात आता असंख्य माणसांना नोकऱ्या नाहीत. त्यातले काही आपले कामगार आहेत तर काही गजराजाचे आहेत. गजराजाच्या कामगारांना सहा महिने भत्ता मिळेल. आपले कामगार उपाशी मरतील. आणखी सहा महिन्यांनी गजराजाचे कामगार व आपले सगळेच बेकार होतील. त्यांना कुणालाही ज्ञान नाही, कसब नाही. पोट भरण्याचा त्यांच्यासमोर मार्ग नाही.”

मध्याने विचारलं, “ह्या सगळ्या परिस्थितीचा आपल्याला काय उपयोग?”

मुंगळ्या म्हणाला, “उसळत्या रक्ताच्या, निरुधोगी, सशस्त्र, आणि टेस्टॉस्टिरॉनचं विष भिनलेल्या तरुण पुरुषांच्या समूहात प्रभावी शक्ती असते. ही शक्ती मार्गाला लावण्याची व बंधनात ठेवण्याची आवश्यकता आहे. गजराजाला ते जमेल असं वाटत नाही.”

मध्याने विचारलं, “काय बडबडतो आहेस?”

मुंगळ्या म्हणाला, “भविष्यात समजेल तुला!”

वर्षभरात माद्दप्रदेशात बंड झालं. बंडखोरांच्या सैनिकांत प्रामुख्याने साखरेची चोरटी आयात करणारे मध्यामुंगळ्याचे नोकर, गजराजाचे बडतर्फ शिपाई, चौकीदार, पहारेकरी यांची भरती होती. मध्यामुंगळ्या या बंडखोरांचे पुढारी होते.

भर युद्धात कुणीतरी मध्याला ठार मारलं. काहीजण म्हणाले खुनी मुंगळ्याचा विश्वासू नोकर होता.

युद्धात गजराजाचा पराभव झाला. तो आपल्या कुटुंबासह चिंचीलेला पळून गेला. चिंचीलेच्या प्रमुखाने गजराजाला अभयदान आणि आश्रय दिला.

मुंगळ्याने लढाई संपताच माद्दप्रदेशाचं प्रमुखपद बळकावलं. स्वतःला अभिषेक करून घेण्याआधी त्याने मध्याची थाटात स्मशानयात्रा काढली.

मुंगळ्याचा बाप म्हणाला, “मुंगळ्या इंद्राचा ऐरावत. मी शामभट्टाचा तट्टू. मुलापुढे मी अगदी फिका पडलोय.”

माद्दप्रदेशीय आता पूर्वीपेक्षा गरीब आहेत. मुंगळ्याची सेना, त्यांची शस्त्रास्त्रे, पगार, घर व त्यांची पंचकोनी छावणी इत्यादीच्या खर्चासाठी मुंगळ्याने करवाढ केलेली आहे.

मुंगळ्या हा कडक शिस्तीचा पुरस्कर्ता असा राज्यप्रमुख आहे. पण तो माद्दप्रदेशीयांच्या लठ्ठपणाकडे व गोडखाऊपणाकडे पूर्ण दुर्लक्ष करतो. जनता मुंगळ्याचा व त्याच्या सैनिकांचा द्वेष करते. पण उघड मुंगळ्याला विरोध करण्याची कुणाला हिंमत होत नाही. माद्दप्रदेशीय पूर्वीसारखेच लठ्ठ आहेत. ते अजूनही पूर्वीसारखंच गोड खातात.

मुंगळ्या व गजराजाच्या लढाईला त्यांनी साखरयुद्ध असं नाव दिलं आहे.

(समाप्त )

**ललिता गंडभीर**

lalitagandbhir@hotmail.com
OneTime Serial Rights

(पूर्वप्रसिद्धी एकता)